सचिव व सचिव समकक्ष दर्जाचे कार्यकारी संचालक /महासंचालक संवर्गामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एसएलएस १४२३/प्र.क्र.३७६ (भाग-३)/आ (वर्ग-१)
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०४ एप्रिल, २०२५.

संदर्भ :- शासन आदेश क्र.एसएलएस १४२४/प्र.क्र.३७६/आ (वर्ग-१), दि.११.१०.२०२४

प्रस्तावना :-

जलसंपदा विभागातील श्री.अभय लक्ष्मणराव पाठक, मुख्य अभियंता यांना सेवाज्येष्ठतेनुसार मुख्य अभियंता (स्थापत्य) संवर्गातून सचिव व सचिव समकक्ष दर्जाचे कार्यकारी संचालक/महासंचालक या संवर्गामध्ये {वेतनश्रेणी S-३० (१४४२००-२१८२००)} संदर्भाधीन दि.११.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानुसार श्री.पाठक यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

श्री.अभय लक्ष्मणराव पाठक यांची सचिव व सचिव समकक्ष दर्जाचे कार्यकारी संचालक/ महासंचालक संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना, सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने पदस्थापनेचे पद
१	श्री.अभय लक्ष्मणराव पाठक	मुख्य अभियंता (द व प्र) व सहसचिव जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक या रिक्त पदी.

२. संदर्भाधीन दि.११.१०.२०२४ रोजीच्या आदेशामध्ये नमूद अटी या आदेशास सुध्दा तंतोतंत लागू राहतील.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील, श्री.अभय लक्ष्मणराव पाठक यांनी पदोन्नतीने पदस्थापना केलेल्या पदावर तात्काळ रूजू व्हावे.

४. वरील पदोन्नत अधिकारी यांनी नवीन नियुक्तीच्या जागी ते कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

५. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्पुरती पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र. ३०३/का-१२, दि.१२.०९.२०१६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०४०४१८१२४००४२७ असा आहे. तसेच सदर आदेश जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANIL VITTHAL DEOKATE

Digitally signed by ANIL VITTHAL DEOKATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=0243d4781b79f364761efde22e15161622e87986fb431d9cbc0ecc6469d5e203, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9A8B949B82C94F286DC79EF74BFCAE2A4E204E31853685E98B0B86C438C888E9, cn=ANIL VITTHAL DEOKATE
Date: 2025.04.04 18:14:16 +05'30'

(अनिल देवकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव , जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (लाक्षेवि/ प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व कार्यकारी संचालक/महासंचालक, जलसंपदा विभाग.
७. मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व मुख्य अभियंता (स्था.), जलसंपदा विभाग.
१०. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
११. संबंधित अधिकारी
१२. संबधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१३. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन आ(वर्ग-१) संग्रहार्थ.